**अतारांकित प्रश्नोत्तरांची पाचवी यादी**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**परभणी-हिंगोली येथील मुख्यालयी अनुपस्थित राहणा-या कर्मचारी व अधिका-यांविरूध्द कारवाई करणेबाबत**

**(१) २७७८ (१०-०४-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-हिंगोली येथील मुख्यालयी न राहणारे तसेच पुर्व परवानगीशिवाय अनुपस्थित राहणा-या कर्मचारी व अधिकारी यांच्याविरूध्द कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सन २०१४-१५ च्या दरम्यान जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील तक्रारीची दखल न घेतल्याने परभणी येथील मराठवाडा जनता विकास परिषदेच्या सदस्यांनी त्याबाबत मुख्य सचिव, यांच्याकडे सन २०१४-१५ च्या दरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे काय,

(३) असल्यास, मुख्य सचिव स्तरावरून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५) :** (१), (२) व (३) ह्या संदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी परभणी व जिल्हाधिकारी हिंगोली यांना दिनांक ८/७/२०१५, १३/७/२०१५ व ५/१०/२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील टोल आकारणीबाबतचा समितीचा अहवालबाबत**

**(२) ४२५४ (१७-०४-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ४८९९९ ला दिनांक ३ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोल आकारणीबाबत अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या सी.पी.जोशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप, अहवाल प्राप्त झाला नसल्यास समितीच्या कार्यकक्षा काय आहेत व समितीचा अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे,

(४) तसेच नव्याने पनवेल खारघर टोलनाका सुरू करण्याची कारणे काय आहेत व हा टोल किती कालावधीसाठी कोणत्या सुत्रानुसार आकारण्यात येणार आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१५) :** (१) होय.

(२) सा.बां. विभाग व म.रा.र.वि. महामंडळातील काही पथकर नाके बंद करणे व काही पथकर नाक्यांवर लहान वाहने, एसटी बस व स्कूल बसेस यांना पथकरातून वगळण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुंषगाने १२ पथकर स्थानके दि.०१.०६.२०१५ पासून बंद करण्यात आली असून ५३ पथकर स्थानंकावर दि.०१.०६.२०१५ पासून कार, जीप तसेच एसटी व स्कूल बसेसना पथकरातून संपुर्ण सुट देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रकल्पावर झालेल्या खर्चाची वसुली करण्यासाठी दि.०३.०१.२०१५ रोजी प्रसिध्द झालेल्या पथकर अधिसूचनेनुसार खारघर (कामोठे) येथे उभारण्यात आलेल्या पथकर नाक्यावर दि.०६.०१.२०१५ पासून पथकर वसूली प्रगतीत आहे. मंजूर निविदेनुसार सवलत कालावधी १७ वर्ष ५ महिने (बांधकाम कालावधी धरुन) आहे.

---

**मुंबईतील भायखळा येथील 'भाऊ दाजी लाड' संग्रहालयाच्या बाजूचे मैदान कार पार्किंगसाठी जागा एका खाजगी संस्थेला दिल्याबाबत**

**(३) ५१८१ (०९-०४-२०१५). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील राणीबागेच्या आवारात असलेल्या 'भाऊ दाजी लाड' संग्रहालयाचा विस्तार करताना बाजुच्या मैदानावर कार पार्किंगसाठी जागा एका खाजगी संस्थेला देण्यास एका राजकिय पक्षाने विरोध दर्शविल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उक्त पक्षाचे अध्यक्ष व लोकप्रतिनिधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महानगरपालिका आयुक्तांना निवेदन सादर केले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व तद्नुसार सदरील भुखंड मुलांकरिता क्रीडांगण म्हणून राखीव ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) राज्य शासनाने सन १९९१ साली मंजूर केलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "ई" विभागाच्या पुनर्रचित आराखड्यात "भाऊ दाजी लाड" संग्रहालयाची इमारत ज्या भूखंडावर स्थित आहे तसेच त्याच्या बाजूचा भूखंड हा विद्यमान वीरमाता जिजामाता भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालय या सार्वजनिक उद्दीष्टांकरिता निर्देशित असून भाऊ दाजी लाड संग्रहालयाच्या लगतच्या भूभागाचे निर्देशन मुलांकरिता क्रिडांगण म्हणून राखीव ठेवण्याचा कोणताही प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्रलंबित अथवा विचाराधीन नाही. सद्य:स्थितीत सदर मैदान हे पूर्णपणे खेळण्याकरिताच वापरण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील पोलीसांमध्ये तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या कर्करोगाचे वाढते प्रमाण**

**(४) ७२०५ (०६-०८-२०१५). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोलीसांमध्ये सुमारे ७० टक्के पोलीस तंबाखूचे सेवन करीत असल्यामुळे ३५ टक्के पोलीसांमध्ये कर्करोगाची लागण होत असल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांमध्ये वाढत असलेले कामाचा ताण व त्यातच तंबाखूच्या व्यसनामुळे वाढत असलेल्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्याबाबत व पोलीसांना कर्करोग मुक्त करण्यासाठी पोलीसांसाठी विविध उपक्रम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :** (१) हे, खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील चेंबूर येथील चरई तलावाचे सुशोभिकरण करण्याबाबत**

**(५) ७७९२ (०६-०८-२०१५). श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.अनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर येथील प्रसिद्ध असलेल्या चरई तलावाचे रंगीत कारंजे, तलावाच्या आतील भागात जॉगिंग ट्रॅक, मुख्य दरवाजा, नाल्याच्या बाजुला लावलेली झाडे, सुगंधी फुलझाडे यांचे सुशोभिकरण करताना ठेकेदाराने दुय्यम प्रतीचे लोखंड व निकृष्ट साहित्याचा वापर करुन केले असल्याची प्रतिक्रिया त्या परिसरातील रहिवाश्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार ठेकेदारांविरुद्ध शासनाने काय कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) : (**१) हे खरे नाही. सदर परिसरातील चरई तलावाच्या सुशोभिकरणाच्या कामात रंगीत कारंजे, तलावाच्या आतील भागात जॉगिंग ट्रॅक, नाल्याच्या बाजूला लावलेली झाडे, सुगंधी फुलझाडे कामांचा समावेश करण्यात आलेला नाही. मुख्य दरवाजा माईल्ड स्टीलचा बनविण्यात आलेला आहे. सबब ठेकेदाराने दुय्यम प्रतीचे लोखंड व निकृष्ट साहित्याचा वापर करुन सदर कामे केली हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील ओझेवाडी-मुढवी उड्डाण पुलाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(६) ८७८१ (२९-०७-२०१५). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील ओझेवाडी-मुढवी उड्डाण पुलाचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामावर आतापर्यंत सुमारे १० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम बंद पडण्याची कारणे काय आहेत व सदर बांधकाम किती मुदतीत पुर्ण केले जाईल ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१०-२०१५) :** (१) सदर ठिकाणी उड्डान पुलाचे बांधकाम नसून माण नदीवर मोठा पूल बांधण्याचे काम ओझेवाडी ते उचेठाण या रस्त्यावर प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

या पुलाचे काम रु. ९.९२ कोटी रकमेस मंजूर असून या पूलाच्या कामासाठी आत्तापर्यंत रु.३.३३ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(३) या पुलाचे काम प्रगतीपथावर असून मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरामधील नागरी भागात विविध प्रकारचे प्राणी पाळल्याने होणा-या आजाराबाबत**

**(७) ८७९० (०६-०८-२०१५). श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दाटीवाटीने वसलेल्या शहरामधील नागरी भागात विविध प्रकारचे प्राणी पाळले जातात अशा प्राण्याच्या संपर्कात आल्यास मनुष्याला विषाणुजन्य सांसर्गिक (झुनोसिस) रोग होऊन मोठया प्रमाणात अपंगत्व अथवा प्रसंगी मृत्यू होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील उत्तर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात शिकाऊ वाहन परवान्यासाठी नागरिकांची होत असलेली गैरसोय**

**(८) ८८६१ (३१-०७-२०१५). श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील उत्तर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात शिकाऊ वाहन परवान्यासाठी वैयक्तिक आल्यास उशीर लागत असल्याचे, पण एजंटाकडून आल्यास काम लवकर होत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी राज्याचे परिवहन आयुक्तांना दिली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन आयुक्तांनी अचानक सदरहू कार्यालयाला भेट दिली असता या गोष्टी त्यांच्या निदर्शनास आल्या या कारणास्तव नियमाप्रमाणे शिकाऊ वाहन परवान्यासाठी नागरिकांची गैरसोय होत असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-११-२०१५) :** (१) व (२) परिवहन आयुक्त यांनी माहे मे, २०१५ मध्ये पुणे व पिंपरी-चिंचवड कार्यालयाच्या भेटीदरम्यान अशी कोणतीही प्रतिक्रिया दिल्याची नोंद नाही.

दिनांक ०१.०१.२०१४ पासून शिकाऊ अनुज्ञप्ती व दिनांक ०१.१२.२०१४ पासून पक्क्या अनुज्ञप्तीसाठी ऑनलाईन अपाईंटमेंट अनिवार्य करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना त्यांच्या सोईनुसार शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो व ऑनलाईन अपॉईंटमेंट घेतलेल्या दिवशी व वेळेनुसार कार्यालयात उपस्थित राहून संगणकीय परीक्षा देऊन उत्तीर्ण झाल्यानंतरच संबंधितास शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करण्यात येते. परिवहन आयुक्त यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड कार्यालयास दिलेल्या भेटीच्या दरम्यान शिकाऊ अनुज्ञप्ती कार्यपध्दती संदर्भात कोणतीही अनियमितता आढळली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माणगांव शहरातील उतेखोल कालव्याला विवर पडल्याने काळनदी व कालव्यालगत असलेल्या वसाहतीमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाल्याबाबत**

**(९) ८८७६ (३१-०७-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव शहरातून वाहणाऱ्या उतेखोल येथील कालव्याला विवर पडले असून या परिसरात काळनदी व कालव्यालगत असलेल्या वसाहतीमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे असे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :** (१) हे अशंत खरे आहे.

काळ प्रकल्पांतर्गत माणगाव शाखा कालवा सा.क्र.१२/६०७ कि.मी. या ठिकाणी कालव्याला गुरुळ (खेकड्याने पाडलेले बिळ Crab Hole ) पडल्याने काही प्रमाणात गळती होत होती. तथापि त्या पाण्यामुळे उतेखोल येथील वसाहतीमध्ये पाणी शिरुन धोका निर्माण झालेला नाही.

(२) सदर कालावधीत सिंचन चालू असल्याने तातडीची उपाययोजना म्हणून गळतीच्या ठिकाणी प्लास्टीक कागद टाकून रिकाम्या सिंमेट गोण्यामध्ये माती भरून खेकड्यांची बिळे बुजवून पाणी गळती बंद करण्यात आली आहे. कायमस्वरुप गळतीप्रतिबंधक उपायोजनांतर्गत दुरुस्तीचे काम निधीचे उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धोबी तलाव (मुंबई) येथील रंगभवन नाट्यगृहाची डागडूजी करण्याबाबत**

**(१०) ८८९४ (०४-०८-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धोबी तलाव येथील रंगभवन नाट्यगृह गेल्या १२ वर्षापासून धूळखात पडले असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नाट्यगृहाच्या डागडुजीकडे सांस्कृतिक कार्य विभागाने जाणूनबुजून दुर्लक्ष केले असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रंगभवन नाट्यगृहाची डागडुजी करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) रंगभवन हे खुले नाट्यगृह असून मा.उच्च न्यायालयाच्या दि. २५.९.२००३ च्या आदेशानुसार शांतता क्षेत्र घोषित करण्यात आले असल्याने तेथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यास बंदी आहे. यास्तव डागडूजी करण्याची आवश्यकता नसून तेथे बंदिस्त नाट्यगृह बांधावे लागेल. ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोवर्धन घाटातील (जि.नांदेड) मामा चौक ते मॉल या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(११) ८९३० (२९-०७-२०१५). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदीवर गोवर्धन घाट (जि.नांदेड) येथे नवीन पूल झाल्याने सिडको, हडको, आणि विद्यापीठाकडे जाणारा एक शॉर्टकट रस्ता म्हणून या रस्त्याचा उपयोग होत असल्यामुळे या रस्त्याचा सर्रास वापर करण्यात येत आहे, परंतू मामा चौक ते मॉल दरम्यानचा रस्ता अतिशय नादुरुस्त झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर गिट्टी व मुरुम पसरल्याने मोटरसायकल धारकांना मोठी कसरत करावी लागत आहे, त्यामुळे त्यांच्या वाहनांना बसणाऱ्या हेलकाव्यामुळे वाहनधारक त्रस्त असुन त्यांनी याबाबत संबंधितांकडे तक्रारी करुन कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर रस्त्यावर गिट्टी व मुरुम पसरल्याने मोटारसायकल धारकांना मोठी कसरत करावी लागत नाही. तसेच वाहन धारकांची कसलीही तक्रार महानगरपालिकेकडे आलेली नाही.

(३) सदरील रस्ता हा नादुरुस्त असल्यामुळे वेळोवेळी खडी व मुरुम तसेच ६ एमएम चुरी टाकूण व रोलरद्वारे दबई करुन रस्ता नेहमीच दुरुस्त करुन देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बफरझोन दिड किलो मिटरने कमी करण्याचा प्रस्तावाबाबत**

**(१२) ९०२२ (३१-०७-२०१५). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बफरझोन दिड किलोमीटरने कमी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे बिल्डरना फार मोठी जमीन बांधकामासाठी उपलब्ध होणार असून मुंबईचे फुप्फुस समजल्या जाणा-या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानावर पर्यावरणदृष्ट्या खूप मोठा विपरित परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बफरझोन दिड किलोमीटरने कमी करण्याचा प्रस्ताव शासन रद्द करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे धोरणानुसार फक्त व्याघ्र प्रकल्पाचे सभोवताली बफर झोन निर्मिती करावयाची आहे. इतर संरक्षित क्षेत्रांभोवती बफर झोनची तरतूद नाही.

मात्र पर्यावरण (संरक्षण) अधिनियमाच्या कलम ३ (V) अंतर्गत प्रत्येक अभयारण्य/राष्ट्रीय उद्यानासभोवती पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Eco Sensitive Zone) घोषित करण्याची तरतूद आहे. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने राष्ट्रीय उद्यान व अभयारण्याचे सुमारे १०.०० कि.मी. परिघात पर्यावरण संवेदनशील क्षेत्र अधिसूचित करण्यात यावे अशी शिफारस केली होती. सर्वोच्च न्यायालाने रिट याचिका क्र. ४६०/२००४ मध्ये दिनांक ०४/१२/२००६ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार जोपर्यंत पर्यावरण संवेदनशील क्षेत्र अधिसूचित करण्यात येत नाही तोपर्यंत अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानाचे 10 कि.मी. परिघातील क्षेत्र पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून गृहीत धरण्यात येत आहे. केंद्र शासन पर्यावरण व खात्याचे मार्गदर्शक सूचना दिनांक

०९/०२/२०११ अन्वये राष्ट्रीय उद्यान व अभयारण्य सभोवताली पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची व्याप्ती ही सरसकट १० कि.मी. न ठेवता संबंधित वन्यजीव संरक्षित क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार ठेवण्याबाबत दिशानिर्देश आहेत. त्यानुसारच संजय गांधी राष्ट्रीय उदयानाचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्र निश्चित करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ताजनापूर प्रकल्पाचे दुसऱ्या टप्प्यातील काम पूर्ण होण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१३) ९०६१ (३१-०७-२०१५). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताजनापूर प्रकल्पाच्या दुस-या टप्प्यातील काम निधी अभावी प्रलंबित असल्याने उर्वरित प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी सुमारे ३५० कोटी रुपयांची गरज असतांना जलसंपदा विभागाने शासनाकडे फक्त ४० कोटी रुपये मागणीचा प्रस्ताव दाखल केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :** (१) व (२) ताजनापूर उप सिंचन योजना टप्पा २ ची अंदाजीत किंमत रु.३९४.४८ कोटी असून या कामावर मार्च २०१५ अखेर रु.६८.८० कोटी खर्च झालेला आहे. सन २०१५-१६ मध्ये रु.४०.०० कोटी निधीची मागणी शासनास करण्यात आली होती. अर्थोपयाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश यानुसार सन २०१५-१६ मध्ये रु.१८ कोटीची तरतुद करण्यात आली असून निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पर्यावरण संरक्षणासाठी 'झाडे लावा, झाडे जगवा' ची घोषणा अंमलात आणण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(१४) ९०९० (३१-०७-२०१५). श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये भौगोलिक क्षेत्रफळाच्या तुलनेने वनक्षेत्राचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षाही कमी असल्याचे मत वन तज्ज्ञांनी माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान व्यक्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत टॉवर बांधताना व रस्ता रुंदीकरण करताना अनेक झाडांना इंजेक्शन देऊन मारण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरण संरक्षणासाठी 'झाडे लावा, झाडे जगवा' ची घोषणा अनेक वर्षापासून दिली जात असूनही यावर उपाययोजना झाल्याचे निदर्शनास येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१५) :** (१) होय.

(२) वन विभागांतर्गत अशा स्वरुपाच्या बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत.

(३), (४) व (५) राज्यातील वन व वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी अनेक वर्षापासून निरंतर वृक्षरोपनाची कामे केली जात आहेत. वनाच्छादनामध्ये वाढ होण्यासाठी अवनत वनांचे पुनर्वनीकरणासाठीच्याही योजना राबविल्या जातात. याशिवाय २० कलमी कार्यक्रम, १०० कोटी वृक्षलागवड, योजना व योजनेत्तर लेखा शीर्षातर्गत तसेच मनरेगा असे वेगवेगळ्या योजने अंतर्गत वृक्ष लागवड कार्यक्रम राबविले जातात. त्यात वन व सामाजिक वनीकरण, वन विकास महामंडळ, ग्राम विकास विभाग, कृषी व फलोत्पादन विभाग इत्यादी प्रामुख्याने कार्यरत आहेत. त्याशिवाय अनेक अशासकीय संस्थाही नियमित वृक्षारोपन करीत आहेत. वृक्ष लागवडीची कामे मोहीम म्हणून घेण्यात येत आहेत. उपलब्ध साधन सामुग्री व आर्थिक तरतूदीप्रमाणे रोपवनाची कामेही करण्यात येत असल्याने वृक्षाच्छादन वाढविण्याचे कामात कोणताही खंड पडलेला नाही.

---

**महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये थेट निवडणुकांमधून स्टुडण्ट कौन्सिल आणि जनरल सेक्रेटरी निवडण्याबाबत**

**(१५) ९३५४ (०४-०८-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये थेट निवडणुकांमधून स्टुडण्ट कौन्सिल आणि जनरल सेक्रेटरी निवडण्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्यातील सर्व विद्यापीठांना आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील महाविदयालये व विद्यापीठांमधील निवडणुकांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) होय.

(२) कार्यवाही विचारधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्थेचे कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(१६) ९३५६ (३१-०७-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था यांचे कार्यालय सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने निबंधक भागीदारी संस्था मुंबई यांचेकडून दिनांक २१ जानेवारी, २०१४ रोजी अभिप्राय मागविलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार नाशिक येथे सदर कार्यालय सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत निबंधक, भागीदारी संस्था यांचे अभिप्रायानुसार याबाबतचा निर्णय शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**जलसंपदा विभागाच्या उर्ध्व गोदावरी प्रकल्पासह २९० प्रगतीतील कामांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) ९३६० (३१-०७-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३०२८ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या उर्ध्व गोदावरी प्रकल्पासह २९० प्रगतीतील कामांचे प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेवाचून रखडल्यामुळे या कामांच्या अंदाजपत्रकामध्ये दिवसेंदिवस वाढ होवून ही कामे रेगाळत पडल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच विदर्भ सिंचन महामंडळाकडे तब्बल दोन हजार कोटीहून अधिक निधी मंजूर असूनही सिंचन प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी हा निधी पडून असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभाग व संबंधित महामंडळाकडे निधी शिल्लक असतांनाही सुधारित प्रशासकीय मान्यता विहित मुदतीत न दिल्यामुळे या प्रकल्पांची कामे सुरु होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

उर्ध्व गोदावरी प्रकल्पासह २६५ प्रकल्पांचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मे, २०१५ मध्ये शासनाच्या विचाराधीन होते.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

जून, २०१५ अखेर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे २३०४ कोटी निधी अखर्चित आहे. मात्र सुधारित प्रशासकीय मान्यता हे या मागचे एकमेव कारण नसून भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन हस्तांतरण ही सुध्दा यामागची कारणे आहेत.

सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी प्रकल्पाच्या कामावर परिणाम होऊ नये याकरिता २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षातील वितरित निधीच्या मर्यादेत प्रमा/सुप्रमा किंमतीपेक्षा वाढीव खर्च करण्यास काही प्रकल्पास मान्यता दिलेली आहे.

(४) २८ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता जुन/जुलै, २०१५ मध्ये प्रदान करण्यात आली आहे. उर्वरित प्रकल्पाचे सुप्रमा प्रस्ताव शासन/महामंडळ स्तरावर छाननीत आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित महामंडळास देणेबाबतचा शासन निर्णय दि. ९ सप्टेंबर, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

**(१८) ९४०४ (३०-०७-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबतच्या विनंतीच्या अनुषंगाने तपासणी करण्याचे निर्देश महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई विद्यापीठाने बीपीएड अभ्यासक्रम एक वर्षासाठी बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(१९) ९४४४ (०४-०८-२०१५). श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने बीपीएड अभ्यासक्रम एक वर्षासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शारिरीक शिक्षण विभागातील शिक्षकांच्या, विद्यार्थ्यांच्या तक्रारी व विभागातील इतर समस्यांचे निवारण करण्याच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत या संदर्भातील ठराव मंजुर करण्यात आला आहे.

(३) या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तारळी, मोरणा, गुरुघर व वांग-मराठवाडी (जि.सातारा) या धरणग्रस्तांना धरणातील पाणी देण्याबाबत**

**(२०) ९५०३ (०३-०८-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोरे अंतर्गत तारळी, मोरणा गुरुघर व वांग-मराठवाडी (जि.सातारा) या धरणग्रस्तांना धरणातील पाणी देण्यासाठी व त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्याचे आश्वासन जलसंपदा मंत्री यांनी माहे मार्च, २०१५ च्या चौथ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणग्रस्तांना पाणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यातील खारभूमी योजनांना मंजूरी देणे व निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२१) ९६५४ (०३-०८-२०१५). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व पेण (जि. रायगड) तालुक्यातील अनेक गावे खाडी किनारी वसलेली असून खाडी किनारी लगत असलेली भातशेती वडीलोपार्जीत पध्दतीने कसत असून गेल्या ६ ते ७ आर्थिक वर्षात खारभूमी योजनांचे प्रस्ताव शासनाकडे सादर केले असून त्यास मान्यता न मिळाल्याने व आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने भात पिकांखालील जमिनीच्या बांधीत क्षेत्रात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तालुक्यातील खाडीलगत असलेल्या जमिनी संरक्षीत करणेच्या दृष्टीने शासन प्रस्तावित योजनांना मंजूरी देवून आवश्यक निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) गेल्या ७ वर्षात अलिबाग व पेण तालुक्यातील अनुक्रमे १० व १४ असे एकूण २४ खारभूमी योजनांची अंदाजपत्रकांपैकी अलिबाग तालुक्यातील ६ व पेण तालुक्यातील ८ असे एकूण १४ खारभूमी योजनांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यात आली आहे. त्याची एकूण किंमत रु.३२७३.५६ लक्ष इतकी असून जुलै २०१५ अखेर या कामासाठी रु.२३७७.५४ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे. मार्च-२०१५ अखेर यापैकी ३ योजनांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. सद्‌य:स्थितीत बाधीत क्षेत्रात वाढ झालेली नाही.

(२) खारभूमी योजनांची नुतनीकरणांची कामे नाबार्ड अर्थ सहाय्यामधून करण्यात येत आहेत. तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण प्रकल्पांतर्गत ७ योजनांची कामे करण्याचे नियोजन आहे. तसेच खारभूमी योजनेची कामे करण्यासाठी खारभूमी योजनेचे आर्थिक मापदंड सुधारित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर वनवृत्त गट - अ, गट - ब व गट - क संवर्गातील अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२२) ९७८३ (०३-०८-२०१५). श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर वनवृत्त गट - अ, गट - ब व गट - क संवर्गातील अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची ४६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर वनवृत्तात दिनांक ३०/४/२०१५ रोजी ४६ पदे रिक्त होती. परंतु दिनांक ३१/७/२०१५ अखेर चंद्रपूर वनवृत्तात वरील रिक्त पदांपैकी ७ पदे भरण्यात आली आहेत. त्यामुळे दि.३१.०७.२०१५ अखेर चंद्रपूर वनवृत्तात एकूण १०५६ मंजूर पदांपैकी फक्त ३९ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) चंद्रपूर वनवृत्तातील रिक्त असलेल्या ३९ पदांपैकी गट-अ संवर्गातील ७ पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तसेच गट-ब संवर्गातील ४ पदे व गट-क संवर्गातील ३ पदे भरण्याबाबतची कार्यवाही अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), नागपूर यांच्या स्तरावर सुरु आहे. त्याचबरोबर उर्वरित गट-क संवर्गातील २५ पदे भरण्याबाबतची कार्यवाही मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर यांचेकडून करण्यात येत आहे.

---

**राज्यातील अमराठी शाळांमध्ये इ.८ वी ते १० च्या अल्पसंख्यांक विकास वर्गासाठी मराठी फाऊंडेशन योजना सुरु करण्याबाबत**

**(२३) ९८२९ (०४-०८-२०१५). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अमराठी शाळांमध्ये इयत्ता ८ वी ते १० वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी "मराठी भाषा फाऊंडेशन योजना" या वर्षापासून (सन २०१५-१६) राबविण्यात येणार असल्याचे मा.अल्पसंख्यांक मंत्री महोदयांनी मुंबई (पत्रकार परिषद) येथे दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत मानसेवी शिक्षकांची नियुक्ती करुन या शिक्षकांवर दरमहा रुपये पाच हजार इतके मानधन देण्यात येणार असल्याचेही मा.अल्पसंख्यांक मंत्री महोदयांनी जाहिर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना यावर्षी किती अमराठी शाळांमध्ये राबविण्यात आली व त्याकरिता किती मानसेवी शिक्षकांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत,

(४) तसेच सदर योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) या वर्षामधील अमराठी शाळांची व नेमणूक केलेल्या मानसेवी शिक्षकांची संख्या याची माहिती राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून मागविण्यात आली आहे.

(४) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. मभायो-२०१३/प्र.क्र.६७/का.९, दि.२७/०४/२०१५ अन्वये मराठी भाषा फौंडेशन वर्ग योजना राज्यातील अमराठी शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ८ वी, ९ वी व १० वी इयत्तेच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकविण्यासाठी सुरु केली आहे. या योजनेमध्ये मराठी विषय शिकविण्यासाठी रु.५०००/- (अक्षरी रु.पाच हजार फक्त) एवढ्या मानधनावर मानसेवी तत्वावर शिक्षकांच्या नियुक्ता करण्यात येतात.

---

**ठाणे येथील मुंबई विद्यापीठ उपकेंद्राची इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत**

**(२४) ९८४० (०४-०८-२०१५). ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक 943 ला दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ढोकाळी (ठाणे) येथे मुंबई विद्यापिठाअंतर्गत विद्यापीठ उप-कैंद्राचे कामकाज गत शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येवून सदर उपकेंद्रातून सध्या दोन अभ्यासक्रम शिकविले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकेंद्रात सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षापासून आणखी ५ नवीन अभ्यासक्रम शिकविण्यात येणार असल्याचे दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवनवीन अभ्यासक्रम शिकविले जात असताना गेल्या ३ वर्षापासून सुरू असलेल्या सदर ठाणे उपकेंद्राच्या संपूर्ण इमारतीचे बांधकाम अद्यापही पूर्ण झाले नसल्याचे तसेच विद्यार्थ्यांना तद्नुषंगिक इतर सोईसुविधा उपलब्ध नसल्याचेही माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठाणे उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय तसेच विद्यार्थ्यांच्या सोई सुविधांसह सदर बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याबाबत**

**(२५) ९८६४ (०४-०८-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा लढा आजच्या पिढीला ज्ञात व्हावा, यानुषंगाने संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे शासनाचे विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केवळ राज्याच्या बोर्डाच्या शाळांमध्येच नव्हे तर सी.बी.एस.सी. व आय.बी.अशा केंद्र सरकारच्या अखत्यारितील बोर्डाच्या अभ्यासक्रमातही हा इतिहास समाविष्ट करण्याचे शासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संयुक्त महाराष्ट्राचा दैदिप्यमान इतिहास नवीन पिढीस ज्ञात व्हावा, यानुषंगाने शासनाकडून याबाबत विचार पूर्ण होऊन पुढे कोणती कार्यवाही करण्यांत येत आहे, याप्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे व सदरचा इतिहास केव्हापर्यंत शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट होणार आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बोर्डांच्या अभ्यासक्रमात समावेश करण्याची बाब राज्य शासनाच्या कक्षेत येत नाही.

---

**वाढत्या वीज दरांमुळे विदर्भातील उद्योग परराज्यात जात असल्याबाबत**

**(२६) ९९१९ (३०-०७-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उद्योग वाढत्या वीज दरामुळे परराज्यात जात असल्याच्या पार्श्वभुमीवर माहे एप्रिल, २०१५ पासून होणाऱ्या प्रस्तावित वीज वाढीच्या प्रस्तावामध्ये औद्योगिक ग्राहकांचे वीज दर कमी ठेवण्याचे शासनस्तरावरुन नियोजित करण्यात आले आहे काय,
(२) असल्यास, छत्तीसगड, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात व इतर राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक वीजेचे दर जास्त असल्याकारणाने राज्यातील उद्योग परराज्यात जात असल्याचे पार्श्वभुमीवर राज्याचे औद्योगिक ग्राहकांचे नवीन वीज दराचे स्वरुप काय आहे,
(३) राज्यातील औद्योगिक ग्राहकांसाठीचे वीजेचे दर अन्य राजाच्या तुलनेत कमी करण्याबाबत आणि राज्यातील उद्योगाचे स्थलांतर रोखणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :** (१) विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीज दर, महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ व विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. आयोगाने दिनांक २६/०६/२०१५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये उद्योग क्षेत्राकरीता ऊर्जा आकारात ४० पैसे ते १२१ पैसे प्रति युनिट (ग्राहकांच्या उपवर्गवारीवर अंवलबून) या मर्यादेत कपात केली आहे. यांच्या परिणामस्वरुप उद्योगांतील ग्राहक वर्गवारीतील विविध उपवर्गवारीच्या वीजदरांमध्ये सरासरी ७ टक्के ते १० टक्के कपात झाली आहे. महाराष्ट्रातील विद्युत निर्मिती केंद्रासाठी लांबच्या राज्यातून (जसे ओरिसा इत्यादी) कोळसा आयात करावा लागतो. त्यामुळे कोळसा वहनाचा खर्च वाढतो. या सर्व बाबींचा विचार करता वेगवेगळ्या राज्यातील औद्योगिक वीज दरांची तुलना करणे योग्य ठरणार नाही. तसेच महाराष्ट्रात उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना मोठ्या प्रमाणात सवलती उपलब्ध आहेत. जसे रात्रीच्या कालावधीतील वीज वापरावर प्रति युनिट १.५० रु. सवलत, लोड फॅक्टर इंन्सेटिव्ह (१५ % पर्यंत), पॉवर फॅक्टर इंन्सेटिव्ह (७ % पर्यंत), उच्च दाब औद्योगिक ग्राहकांसाठी ३ % सवलत, विहित मुदतीच्या आत बिल भरल्यास १ % सवलत, अशा एकूण २६ % पर्यंत सवलती उपलब्ध आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी अनधिकृतपणे कांदा विक्री करण्याची दिलेली परवानगी**

**(२७) ९९९१ (०३-०८-२०१५). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १५ मे, २०१५ रोजी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांच्या दालनात व्यापारी आणि राजकीय कार्यकर्ते यांची सुमारे ४५ मिनिटे झालेल्या बैठकीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी भाजीपाला घाऊक बाजारातील ४० व्यापाऱ्यांना अनधिकृतपणे भाजीसोबत कांदा विक्री करण्याची परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सचिवांनी दिलेली ही परवानगी शासनाच्या कोणत्या नियम व उपविधी प्रमाणे देण्यात आली आहे,

(३) असल्यास, अशा प्रकारे अनधिकृतपणे पंचतारांकित, हॉटेल्स व खानावळींना सुमारे १५ ते २० ट्रक कांदा पुरविला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :** (१) नाही. दि. १५ मे, २०१५ रोजी भाजीपाला मार्केटचे काही व्यापारी यांनी मार्केटच्या अडचणींबाबत बाजार समितीच्या सचिवांशी चर्चा केली. त्यावेळी घाऊक भाजीपाला बाजार आवारात कांदा विक्री करता येणार नाही अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व शाळा आणि महाविदयालयातुन स्काऊट गाईडचे युनिट सुरु करणेबाबत.**

**(२८) ९९९७ (०४-०८-२०१५). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयांतून स्काऊट गाईडचे युनिट सुरु होणे गरजेचे असल्याचे मत, मा. राज्यपाल महोदयांनी राजभवन येथे महाराष्ट्र भारत स्काऊट गाईड्स संस्थेतर्फे आयोजित राज्य पुरस्कार प्रमाणपत्र वितरण समारंभात माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात व्यक्त केले होते, हे खरे आहे काय,

(२) महाराष्ट्रातील स्काऊट गाईडची नोंदणी भारतात सर्वाधिक असून, या चळवळीतून शालेय विद्यार्थ्यांच्या मनावर सहकार्य आणि राष्ट्रभक्तीचे संस्कार होत असल्याचे गौरवोद्‌गार या कार्यक्रमात काढले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. राज्यपाल महोदयांच्या मतानुसार राष्ट्रभक्तीने प्रेरित पिढी निर्माण करण्याच्या हेतूने राज्यातील प्रत्येक शाळा महाविद्यालयांतून स्काऊट गाईडचे युनिट सुरु करण्याबाबत शासनाने कोणती ठोस उपाययोजना केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर बाब तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सीलबंद पाणीविक्री करण्यासाठी ब्युरो ऑफ इंडियन स्टॅंडर्ड कायद्या अंतर्गत उत्पादकाला पाणी तपासणी प्रयोगशाळा व तंत्रज्ञ ठेवणे बंधनकारक असल्याबाबत**

**(२९) १००८७ (०४-०८-२०१५). श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव येथे सीलबंद पाणीविक्री करण्यासाठी ब्युरो ऑफ इंडियन स्टॅंडर्ड कायद्या अंतर्गत व्यवसायिकाला पाणी तपासणी प्रयोगशाळा व तंत्रज्ञ ठेवणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवसायिक कायदेशीर बाबीची पुर्तता व्हावी म्हणून केवळ सही करण्यासाठीच तंत्रज्ञाची नियुक्ती करत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवसायिक सर्व कायदे व नियमांचे उल्लंघन करुन सीलबंद पाण्याच्या बाटल्या तयार करुन अवैध विक्री करीत आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष बापट (१७-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
BIS प्रमाणपत्र धारण केल्याशिवाय, या व्यवसायिकांना अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत परवाना जारी केला जात नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.
तथापि, नाशिक विभागाने एप्रिल, २०१५ पासून पॅकेज्ड ड्रीकींग वॉटरचे एकूण १२ नमुने विश्लेषणासाठी घेतले. त्यापैकी, ०२ नमुने असुरक्षित, ०१ नमुना कमी प्रतीचा तसेच ०९ नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

---

**राज्यात ललित कला अकादमीची स्थापना करण्याबाबत**

**(३०) १०११५ (०४-०८-२०१५). श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ललित कला अकादमीची स्थापना झालेली नाही आणि प्रत्येक महसूली विभागात एक कला अकादमीची स्थापना करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, ललित कला व कला अकादमीची स्थापना केव्हा करण्यात येईल ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) राज्यात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कला संचालनालयांतर्गत चित्रकला, शिल्पकला व मुद्रकला या दृष्यकलांबाबत शिक्षण दिले जाते. त्यामुळे वेगळी ललित कला अकादमी स्थापन करण्यात आलेली नाही व करण्याची बाब विचाराधीन नाही. तसेच, राज्यात दिनांक ०२.७.१९९१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र कला अकादमीची स्थापना करण्यात आली असून आता ती पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी या नावाने ओळखली जाते.

---

**परभणी जिल्ह्यातील कृषी वीज बील माफीबाबत**

**(३१) १०२१९ (३०-०७-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागील वर्षीची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता परभणी जिल्ह्यातील कृषी वीज पंप धारकांच्या वीज बील माफी बाबत राज्य शासनाने सन २०१४-२०१५ दरम्यान आदेश काढले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशाप्रमाणे परभणी जिल्ह्यातील किती शेतक-यांना या वीज बील माफीचा लाभ प्रत्यक्षात मिळालेला आहे,
(३) तसेच, संपुर्ण वीज बील माफी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :** (१) हे खरे आहे. शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४० (शिकाना)/ऊर्जा-५, दि.१९.१२.२०१४ द्वारे दुष्काळग्रस्त गावातील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, २०१४ या त्रैमासिक वीज बिलामध्ये संपूर्ण माफी देण्याचा सुधारित निर्णय घेतलेला आहे.
(२) परभणी जिल्ह्यातील एकूण ८३,४७६ शेतक-यांना वीज बील माफीचा लाभ प्रत्यक्षात मिळाला आहे.
(३) परभणी जिल्ह्यातील एकूण ८३,४७६ तसेच राज्यात एकूण १९,२८,०८७ शेतीपंप ग्राहकांना माहे डिसेंबर-२०१४ च्या त्रैमासिक वीज बिलामध्ये संपूर्ण माफी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रोजगार हमी योजनेची कामे करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याबाबत**

**(३२) १०२९६ (०३-०८-२०१५). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेची कामे करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारा, अशी कायदयात स्पष्ट तरतूद असतानाही या कामाची जबाबदारी जिल्हा परिषदांच्या अभियंत्यावर टाकण्यात आली असल्याने जादा कामाचा हा भार सहन होत नसल्याने ठाणे जिल्हयासह राज्यभरातील ८ हजार अभियंत्यांनी माहे मे, २०१५ पासून बहिष्कार घातला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे रोहयोमार्फत पावसाळयापूर्वी करण्यात येणारी सर्व कामे ठप्प झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे ग्रामीण भागातील लाखो मजूरांची आर्थिक हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१५) :** (१) जिल्हा परिषद अभियंता संघटना- महाराष्ट्र यांनी दि. १८.०५.२०१५ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व कामांवर बहिष्कार टाकत असल्याचे कळविले आहे.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासाठी राज्यात ९९६ कंत्राटी तांत्रीक अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्यामार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मात्र योजनेंतर्गत झालेल्या कामांच्या भरलेल्या हजेरीपत्रकांपैकी २५% हजेरी पत्रकांचे चाचणी मुल्यांकन (Check Measurement) नियमित शाखा अभियंता कृषी अधिकारी यांचेकडून होणे अपेक्षित आहे. तथापि बहिष्कारामुळे सर्व कामे ठप्प झालेली नसून काही कामांवर त्याचा अंशत: परिणाम झालेला आहे.
(३) कंत्राटी तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत योजनेची कामे सुरु असून, मजुरांना कामे पुरविली जात आहेत. जिल्हापरिषद अभियंत्यांच्या बहिष्कारामुळे कोणत्याही ठिकाणी मजुरांना कामे नाकारण्यात आलेली नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेसाठी उपजिल्हाधिकारी यांचे पद तात्काळ भरण्याबाबत**

**(३३) १०४०३ (०३-०८-२०१५). श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेसाठी असलेले उपजिल्हाधिकारी यांचे पद गेले अनेक महिने रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे आदिवासी बहुल असलेल्या पालघर तालुक्यातील ग्रामीण भागातील हजारो बेरोजगारांसाठी रोजगार हमीच्या कामाची तजवीज करण्यासाठी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१५) :** (१), (२), (३) व (४) नवनिर्मित पालघर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना जिल्हाधिकारी कार्यालय पालघर (रोहयो) कक्षासाठी १० पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीच्या दि.१०.०६.१५ च्या बैठकीत मान्य झाल्याने, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०६.०७.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. पालघर जिल्हाधिकारी कार्यालयातील (रोहयो कक्ष) यांच्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या १० पदांच्या आकृतीबंधात उपजिल्हाधिकारी (रोहयो) या पदाचाही समावेश आहे. सदर पदावर नियुक्ती देण्यास महसूल व वन विभागास कळविण्यात आले आहे.

---

**सीसीआयचा कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये रुई गाठ व सरकी विक्रीत झालेला गैरव्यवहार**

**(३४) १०४३१ (०३-०८-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीसीआयचा कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये २३५ कोटींचा रुई गाठी व सरकी विक्रीत गैरव्यवहार झाला असल्याचे तसेच या सरकीतून ग्रेडर्सने तब्बल २३ कोटी रुपयांची मार्जीन ठेवल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २५० कोटी रुपयांच्या या घोटाळयाची चौकशी सीबीआय कडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने वर्ग १ व २ च्या अधिकाऱ्यांच्या आंतरराज्य बदल्यांचे अधिकार विभाग प्रमुखांना दिल्याबाबत**

**(३५) १०४७१ (०३-०८-२०१५). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वर्ग १ व २ च्या अधिकाऱ्यांच्या आंतरराज्य बदल्यांचे अधिकार विभाग प्रमुखांना दिल्यानंतर वन विभागात ४३ वन क्षेत्रपालांच्या बदल्या करण्यात आल्या असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही वन क्षेत्रपालांनी मुख्य वनसंरक्षक (सीसीएफ) मर्जी संभाळत दुय्यम दर्जाच्या स्थानी बदली करुन घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाब क्र. २ नुसार शासनाने या संदर्भात चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१५) :** (१) दिनांक २२.०५.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये, वन विभागातील वनक्षेत्रपाल गट-ब (राजपत्रित) अधिकारी यांच्या सर्वसाधारण बदल्या करण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे, त्यानुसार राज्यस्तरावरील (State Level ) बदलीबाबत त्यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दिनांक २७ ते २९.०५.२०१५ या कालावधीत नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशींनुसार एकूण ४३ वनक्षेत्रपालांच्या राज्यस्तरावर (State Level ) बदल्या करण्यात आलेल्या आहेत.
(२) व (३) बदल्या करण्याची कार्यवाही नियमानुसार करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील अरुणावती धरणाचा कार्यभार पाहणा-या उपविभागीय अभियंताचे रिक्त पद भरण्याबाबत**

**(३६) १०५३३ (०३-०८-२०१५). श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील मोठ्या प्रकल्पापैकी अरुणावती धरणाचा कार्यभार पाहणा-या उपविभागीय अभियंताचे पद गत तीन वर्षापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पद रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) उपरोक्त पद भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०९-२०१५) :** (१) होय.
(२), (३) व (४) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे आदेश दिनांक ३०/०५/२०१५ अन्वये श्री. अ. ना. टाकळकर, उपविभागीय अधिकारी यांची पदस्थापना करण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ मुंबई यांनी पदोन्नती पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यास स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे श्री. टाकळकर सदर पदी अद्यापपर्यंत रुजू झालेले नाहीत. यास्तव सदर पद रिक्त आहे.

---

**गर्भलिंग निदान विरोधी कायदयासंबंधीच्या केंद्रस्तरीय समितीने पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयाला दिलेल्या भेटीत सोनोग्राफी केंद्राच्या कार्यपध्दतीबाबत आक्षेप नोंदविल्याबाबत**

**(३७) १०६१६ (०४-०८-२०१५). श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गर्भलिंग निदान विरोधी कायदयासंबंधीच्या केंद्रस्तरीय समितीने पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयाला दिलेल्या भेटीत ससूनमधील सोनोग्राफी केंद्राच्या कार्यपध्दतीबाबत आक्षेप नोंदवले असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीच्या आक्षेपावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) लागू नाही.

---

**राज्यातील महिला व बालकांवरील अत्याचार थांबविण्याबाबत**

**(३८) १०६१७ (०३-०८-२०१५). श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मार्च व एप्रिल या दोन महिन्यात महिला व बालकांवरील अत्याचारांचे प्रमाण प्रचंड आढळले असुन बालकांच्या अपहरणात राज्य आघाडीवर असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकांचे अपहरण व महिलांवरील अत्याचार रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) राज्यात महिला व बालकावरील अत्याचाराच्या मार्च २०१५ ते एप्रिल २०१५ या कालावधीमध्ये महिलांवरील अत्याचाराची एकूण दाखल गुन्हे ७२९६ इतकी असून, बालकांच्या अपहरणाची एकुण दाखल गुन्हे १२८८ इतकी आहे.

(२) **महिला अत्याचारावरील उपाययोजना :-**

१) महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाची स्थापना

२) सर्व आयुक्तालय व जिल्ह्यांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला सहाय्य कक्षाची स्थापना

३) जिल्हा/आयुक्तालय पातळीवर तसेच पोलीस स्टेशन पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन

४) बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांचा तपास जलद गतीने व्हावा तसेच बलात्कारासारख्या गुन्ह्यांना आळा बसावा याकरिता सर्व घटक प्रमुखांना मार्गदर्शक सूचना परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

५) राज्यात २७ विशेष न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

६) महिलांची छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाकडून राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना वेळोवेळी मार्गदर्शक सूचना व परिपत्रके निर्गमित केली जातात.

७) महिलांचे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध संदर्भात विशेष पोलीस महानिरीक्षक, म.अ.प्र.वि. समन्वय अधिकारी आहेत.

८) अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची १२ घटकामध्ये स्थापना केली आहेत.

**बालकांचे अपहरण व अत्याचारासंबंधी उपाययोजना :-**

१) सर्व पोलीस घटकातील पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एका अधिकाऱ्यास बाल कल्याण अधिकारी म्हणून नामनिर्देशित केले आहे.

२) सर्व पोलीस घटकाच्या ४५ मुख्यालयात विशेष बाल पोलीस पथक स्थापन करण्यात आले आहेत.

३) बालकांचे लैंगिक छळास प्रतिबंध अधिनियम-२०१२ च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता सर्व पोलीस घटक प्रमुखांना सुचना

निर्गमित करुन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

४) हरवलेल्या मुलांच्या बाबतीत कायदेशीर पालकांकडून तक्रार प्राप्त झाल्यावर त्याची नोंद नोंदवहीत न घेता थेट अपहरणाचा गुन्हा (FIR) दाखल करण्यातबाबत दि.१०.११.२०१४ चे शासन परिपत्रक काढले आहे.

५) हरवलेल्या बालकांच्या तपासाचा कालावधी ४ महिन्यापेक्षा अधिक झाला तर अशा तक्रारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे सुपुर्द करण्यात यावा दि.१०.११.२०१४ चे परिपत्रक.

६) प्रत्येक जिल्हयात हरविलेल्या मुलांचा शोध घेण्याकरिता स्वतंत्र पथक तयार करुन शोध मोहिम राबविण्यात येते. पोलीस गॅझेटमध्ये प्रसिध्दी करीता पाठविण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग घेण्यात येते, वृत्त पत्रात तसेच दुरदर्शनवर बेपत्ता मुलांची माहिती पालकांच्या संमतीने देण्यात येते.

७) विशेष बाल पोलीस पथके, बालकल्याण अधिकारी, बाल कल्याण समिती, बाल न्यायमंडळे,

८) बालकांचे लैंगिक छळास प्रतिबंध अधिनियम २०१२ च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता पोलीस महासंचालक कार्यालयाने सर्व पोलीस घटक प्रमुखांना सूचना निर्गमित करुन कार्यशाळा आयोजित करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वीज चोऱ्या रोखण्यासाठी आठ हजार फिडर व्यवस्थापक नेमण्याबाबत**

**(३९) १०६२० (३०-०७-२०१५). श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज चोऱ्या रोखण्यासाठी शासनाने आठ हजार फिडर व्यवस्थापक नेमणार असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयानुसार किती फिडर व्यवस्थापकाची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१५) :** (१) वीज वाहिनीवरील तांत्रिक व वाणिज्यिक हानी कमी करण्याच्या उद्देशाने फिडर व्यवस्थापक ही योजना प्रायोगिक तत्वावर महावितरण कंपनीकडून सुरु करण्यात आली आहे. या योजनेची मार्गदर्शक तत्वे व सूचना महावितरण कंपनीकडून सर्व क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रायोगिक तत्त्वावर प्रती परिमंडळ १० फिडर निवडण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यानुसार आतापर्यंत एकूण १६१ फिडरची निवड करण्यात आली आहे, त्यापैकी हिंगाली मंडळांतर्गत ३, अमरावती मंडळांतर्गत १, परभणी मंडळांतर्गत २ व जळगांव मंडळांतर्गत १ अश्या एकूण ७ वाहिन्या फिडर व्यवस्थापकास पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

---

**पुणे विद्यापीठांतर्गत करण्यात आलेल्या इमारतीच्या बांधकामाचे सर्वेक्षण करणेबाबत**

**(४०) १०६३७ (०४-०८-२०१५). श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठांतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या इमारतीचे बांधकाम विकास आणि मिळकतकर विभागाकडून नुकतेच सर्वेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्वेक्षणात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विद्यापीठाने बहुतांश इमारतीचा मिळकतकर भरलेला असून उर्वरित इमारतीचा मिळकतकर महापालिकेने सर्वेक्षण केल्यानुसार भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमळनेर (जि. जळगाव) क्रीडा संकुलाच्या कामाबाबत**

**(४१) १०८२७ (०४-०८-२०१५). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील क्रीडा संकुलाच्या कामाची प्रगती व सद्यस्थिती काय आहे,

(२) या कामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) या क्रीडा संकुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) अमळनेर येथील तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर यांच्यामार्फत करण्यात येत आहे. सदर संकुलातील क्रीडांगण समपातळीत करण्याचे काम, ४०० मी. धावनपथाचे काम, दर्शनी भागात कुंपण भिंत, मेन गेटचे बांधकाम व उर्वरित बाजूस युसीआर चेनलिंकचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच बॅडमिंटन हॉलचे बांधकाम सुरु आहे.

(२) व (३) तालुका क्रीडा संकुल, अमळनेर बांधकामासाठी रु.१००.०० लक्ष निधी वितरीत केला असून त्यापैकी रु.९०.०० लक्ष निधी खर्च झाला आहे. सदर क्रीडा संकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

---

**मराठवाडयामध्ये जलयुक्त शिवार योजना राबविण्याबाबत**

**(४२) १०८३५ (०३-०८-२०१५). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयामध्ये पाणी संकट निर्माण झाले असून धरणामध्ये फक्त ८% पाणी साठा असल्याने दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कायमस्वरुपी पाणी प्रश्न सोडविण्यासाठी जलयुक्त शिवार योजना राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१०-२०१५) :** (१) होय.

दिनांक १५/०५/२०१५ रोजीच्या पाणीसाठा अहवालाप्रमाणे मराठवाड्यातील मोठया, मध्यम व लपा (राज्यस्तरीय) प्रकल्पांतील जलाशयामध्ये एकूण संकल्पीत पाणीसाठ्याच्या ८% एवढा उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता.

(२) पिण्यासाठी लागणारे पाणी प्रथम प्राधान्याने राखून ठेवण्यात आले आहे. तसेच दि.१५.१०.२०१५ च्या जलसाठ्यांवर आधारित व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांच्या दि.१९.९.२०१४ च्या निकालानुसार जायकवाडी धरणात उर्ध्व भागातील धरणातून पाणी सोडण्याबाबतची कार्यवाही नियोजित आहे.

(३) टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून राज्यात जलयुक्त शिवार अभियान दि. ०५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या अभियानाकरिता जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून रु.१००० कोटी विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इगतपूरी (जि.नाशिक) तहसिल कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४३) १०९५० (०३-०८-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथे तहसिल कार्यालयासाठी कोट्यवधी रुपये खर्चुन बांधण्यात आलेल्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने महसुल विभागाने या नविन इमारतीचा ताबा घेण्यास नकार दिल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात मध्यवर्ती ठिकाणी असलेली जुनी इमारत बांधण्याचे अभिप्रेत असताना शहरापासून दोन कि.मी. वरील बोरटेंभे गांव शिवारात डोंगराच्या पायथ्याशी सदर इमारत बांधण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीच्या कामात अनेक त्रुटी राहिल्या असून तालुक्यात पर्जन्याचे अधिक प्रमाण पाहता ही इमारत

असुरक्षित असल्याचे इगतपुरीचे तहसिलदार यांचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निकृष्ट व गैरसोयीचे ठिकाणी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्चुन बांधलेली इमारत विनावापर पडून असल्याने शासनाच्या निधीचा अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-१०-२०१५) :** (१) प्रशासकीय इमारतीचे काम निकृष्ट असल्याने महसूल विभागाने ताबा घेण्यास नकार दिला हे खरे नाही. प्रश्नाधीन कामाचे चाचणी निष्कर्ष सर्वसाधारणपणे समाधानकारक आहेत.
(२) प्रश्नाधीन इमारतीचे बांधकाम उपभोक्ता विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्नाधीन इमारतीचे काम मंजूर वावानुसार पूर्ण झाले असून इमारत वापरण्यासाठी सज्ज करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### इगतपुरी (जि.नाशिक) शहर / पर्यटन स्थळाचा लोणावळा-खंडाळाच्या धर्तीवर विकास करणेबाबत

**(४४) १०९५१ (०६-०८-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी (जि.नाशिक) शहर / पर्यटन स्थळाचा लोणावळा-खंडाळाच्या धर्तीवर विकास करण्यात यावा, अशी मागणी पर्यटकांकडून सातत्याने करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्नोक्त मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) इगतपुरी शहर तालुका परिसराचे पर्यटनस्थळाचे दृष्टीने असलेले महत्व विचारात घेता सदरील पर्यटन स्थळाचे विकासाबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१५) :** (१) प्रश्नाधीन मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि नाशिक जिल्ह्याचा पर्यटन विकासाचा बृहद् आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या आराखड्यात इगतपुरी तालुका परिसरातील पर्यटनक्षम स्थळांचा समावेश करण्यात आलेला आहे. कामाच्या प्राथम्यक्रमानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार या आराखड्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. याशिवाय महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाकडून प्रसिध्दी करण्यात येते. निवास न्याहरी योजनेंतर्गत इगतपूरी व भावली धरण परिसरातील २९ घरकुलांची नोंद करण्यात आलेली आहे. भावली धरण परिसर व इगतपुरी परिसराचे माहितीपत्रक तयार करण्यात आलेले असून ते पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

---

### राज्यातील अनाथ बालकांना शिधापत्रिका व रहिवासी दाखले देण्याबाबतचा प्रस्ताव

**(४५) १०९५२ (३१-०७-२०१५). डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३ मधील प्र.क्र. ४९९८९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनाथ मुलांना २ टक्के समांतर आरक्षण देण्याबाबतच्या शासनाच्या विचाराधिन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०९-२०१५) :** (१) व (२) राज्यातील अनाथ मुलांना २% समांतर आरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मुलींना पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देणेबाबत**

**(४६) १०९५८ (०४-०८-२०१५). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींना पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देणेबाबत शासनाचे विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, सदरहू विचार केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबई, अंधेरी येथील बेहरामबाग, आदर्शनगर, लोखंडवाला, गणेशनगर, आनंदनगर भागात मंडई उभारण्याबाबत**

**(४७) ४९३४५ (०३-०७-२०१४). श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, अंधेरी येथील बेहरामबाग, आदर्शनगर, लोखंडवाला, गणेशनगर, आनंदनगर या भागात मंडई उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर भागातील विकासाच्या दृष्टीने मंडई उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :** (१) मुंबई अंधेरी येथील बेहरामबाग, आदर्शनगर, लोखंडवाला, गणेशनगर, आनंदनगर या भागापैकी लोखंडवाला येथे मंडईकरिता आरक्षित असलेल्या भूभागावर समायोजन आरक्षणांतर्गत मंडई बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाच्या अखत्यारीत आहे. तथापि बेहरामबाग, आदर्शनगर, लोखंडवाला, गणेशनगर, आनंदनगर या भागात मंडईकरिता आरक्षित भूभाग विकास नियोजन आराखड्यात दर्शविलेला नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन खात्यामार्फत मुंबईसाठी सुधारीत विकास आराखडा बनविण्याचे काम चालू आहे.

(३) सदर भागातील समायोजन आरक्षणांतर्गत असलेल्या मंड्यांव्यतिरिक्त अतिरिक्त मंडईची आवश्यकता असल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागाकडून अभिप्राय/मागणी प्राप्त करुन विकास नियोजन खात्यामार्फत विकास आराखड्यामध्ये लोकसंख्येबाबत असलेल्या निकषांच्या अनुषंगाने अतिरिक्त मंडईची तरतूद करता येऊ शकेल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मध्य गोदावरी खो-यातील १८ टीएमसी पाण्याच्या बृहत आराखड्यास मंजुरी मिळणेबाबत**

**(४८) ४९४१८ (२३-०७-२०१४). श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य गोदावरी खो-यातील १८ टीएमसी पाणी अडविण्याच्या संदर्भातील बृहत आराखड्यास मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मा.राज्यपाल यांच्याकडे मान्यतेसाठी शासनाने पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १९ डिसेंबर, २०१३ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार मा.मुख्यमंत्री अथवा शासन प्रतिनिधी यांनी मा.राज्यपालांकडे याबाबत प्रत्यक्ष भेटून आपली भुमिका मांडली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन (२८-१०-२०१५) :** (१) जलसंपदा विभागाचे दिनांक ०३.०४.२०१३ च्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून भविष्यकालीन योजनेत बृहत प्राथमिक आराखड्यास तत्वत: मान्यता दिली आहे.
(२) होय.
(३) मा.मुख्यमंत्री यांनी मा.राज्यपाल महोदयांना दिनांक ०५.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणी विनंती केली आहे. त्यानुसार मा.राज्यपालांचे सन २०१४-१५ निदेशामध्ये सर्वंकष योजना अतिरिक्त साधनसंपत्तीच्या उपलब्धतेसह विचारार्थ सादर करणेबाबत सुचित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महादेव कोळी, टोकरी कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी यांना जातीचे दाखले मिळण्यास अडचणी निर्माण झाल्याबाबत**

**(४९) ५००५४ (०८-०७-२०१४). श्री.दिपकराव साळुंखे-पाटील श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महादेव कोळी, टोकरी कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी यांना जातीचे दाखले मिळण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोळी बांधवांना जातीचे दाखले मिळावेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश असलेल्या अनुसूचित जमातींच्या व्यक्तिंना जमातीचे प्रमाणपत्र देण्याची बाब महसूल विभागांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या उपविभागीय अधिकारी (महसूल) किंवा यथास्थित जिल्हास्तरावरील उपजिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे.
(२) व (३) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कामकाज महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) व त्या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पारीत केलेले "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३" मधील तरतुदीनुसार करण्यात येते. या अधिनियम व नियमातील तरतूदींची पूर्तता करणाऱ्या दावेदारास तपासणी समित्या तात्काळ वैधता प्रमाणपत्र निर्गमित करतात.

---

**अमरावती, औरंगाबाद आणि सातारा येथे फुडपार्क उभारण्याबाबत**

**(५०) ५०२७५ (०१-०७-२०१४). श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी उत्पादनाच्या मळणीच्या ठिकाणापासून ते ग्राहकांपर्यंतचा प्रवास मोठ्या फसवणूकीचा आणि नुकसानीचा असून त्याची झळ सर्वसामान्य शेतक-यांपासून शासनाला सोसावी लागत असल्याने अन्नप्रक्रिया उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अमरावती, औरंगाबाद आणि सातारा या ठिकाणी फूडपार्क उभारण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या फूडपार्कची निर्मिती किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(३) तसेच संपूर्ण राज्यात उक्त प्रकल्प राबविण्यात येणार आहे काय, त्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (०३-०२-२०१५) :** (१) होय.

औरंगाबाद आणि सातारा या ठिकाणी मेगा फुड पार्क उभारणीसाठी केंद्र शासनाने अंतिम मंजूरी दिलेली आहे.

(२) औरंगाबाद आणि सातारा या ठिकाणी उभारण्यात येणारे मेगा फुड पार्क पुढील २-३ वर्षात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

(३) सदर योजना केंद्र शासनाच्या अन्न व प्रक्रिया उद्योग मंत्रालयामार्फत राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**श्री.उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.